‘मधुक्रांती-२०२०’



# लाभदायी मधमाशी पालनासाठी वसाहतींचे सुयोग्य विभाजन आवश्यक



सचिन उगले
(मो.नं. ९८५००७३२४२)
बी-कीपर,
बसवंत मधमाशी उद्यान व प्रशिक्षण केंद्र,
पिंपळगाव (ब.), ता. निफाड, जि. नाशिक

- मकरंद व पराग मुबलक असतील त्यावेळी वसाहतीचे विभाजन करावे
- सातेरी मधमाश्यांमध्ये उठावाचे प्रमाण सर्वाधिक असते.
- वसाहतीचे नियमित निरीक्षण; नोंदी ठेवणे गरजेचे
- राणीघरे असलेली चौकट व्यवस्थित हाताळली पाहिजे

**म**धमाश्यांच्या वंशवृद्धीसाठी तसेच मधमाशी पालनाच्या आर्थिक लाभासाठी महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे वसाहतीचे विभाजन होय. प्रत्येक वसाहतीत एकच राणी असते आणि तीच वसाहतवृद्धीचे महत्त्वाचे काम करते.

वसाहतीचे विभाजन दोन प्रकारांत होते. नैसर्गिक व अनैसर्गिक विभाजन. नैसर्गिक विभाजन आपण वसाहतीच्या देखभालीकडे दुर्लक्ष केल्यामुळे होत असते. नैसर्गिक विभाजनाचे काही फायदे व तोटे आहेत. आपण वैज्ञानिकदृष्ट्या मधमाशी पालन करत असताना अनैसर्गिक प्रक्रिया व्यवस्थितरित्या केल्यास उद्योग फायद्यातच येतो.

**उठाव (स्वार्म) :-** निसर्गात मकरंद व पराग मिळत असलेल्या हवामानात वसाहती अनेक राणी घरे बांधतात व उठाव करून वसाहतीची संख्या वाढवतात. एका मूळ वसाहतीपासून वसाहतीच्या आकारानुसार २ ते ५ उठाव होऊन स्वतंत्र वसाहत निर्माण होऊन काम करू लागते. उठावाच्या संकेतादाखल संबंधित वसाहतीत बऱ्याच प्रमाणात राणीचे सेल आढळतात. राणीचे सेल छत त्याच्या चौकटीच्या खालच्या बाजूस आढळतात तसेच बऱ्याच प्रमाणात नर सेल दिसून, वसाहतीत खूप गर्दी झालेली असते. आतमध्ये जागा नसल्याने मधमाश्या बाहेर लटकलेल्या दिसतात.

**समस्या :** ही समस्या सातेरी मधमाशीमध्ये अधिक असते. वसाहती अशक्त म्हणजे कमजोर होतात, त्यांचे पूर्ण लक्ष स्वार्म- राणी सेल यांच्याकडे असल्याने त्या मध गोळा करत नाहीत. स्वार्मिंग म्हणजे उठावानंतर वसाहतीतून बऱ्याच माश्या गेल्याने वसाहत कमजोर बनते.

वसाहत सोडण्यापूर्वी मधमाश्या मधाने पोट भरून



घेतात. बऱ्याच मधमाश्या वसाहतीच्या बाहेर येतात. यानंतर राणीमाशी बाहेर येऊन जवळपासच्या झाडावर बसते. बाकी मधमाश्या राणीबरोबर त्या झाडावर लटकलेल्या दिसतात. त्यानंतर मधमाश्या २ ते २४ तासांत आजूबाजूस जागा शोधतात. योग्य स्थान निवडून तेथे वसाहत बनवण्यात येते. एका वसाहतीतून एकापेक्षा जास्त दोन ते पाच स्वार्मिंग निघू शकतात.

**स्वार्मिंग पकडणे :** ही क्रिया रोखण्यासाठी आपण वसाहतीचे विभाजन करतो. परंतु तरीही उठाव झाल्यास, स्वार्मिंग जेव्हा जवळ झाडावर असेल तेव्हा ते पकडण्यासाठी स्वार्म नेटचा वापर करावा. सर्वप्रथम



रिकामी मधपेटी घेऊन त्यामध्ये रिकाम्या चौकटी, छत लावावे. त्यानंतर स्वार्मिंगवर पाणी शिंपडावे. पाण्याचा थोडासाच स्प्रे करावा. हे स्वार्म नेटमध्ये पाडावे. त्यानंतर रिकाम्या माधव पेटीचे गेट बंद करून घ्यावे व पकडलेले स्वार्मिंग मध पेटीत झाडावे. त्यानंतर ती मधपेटी बंद करून ठेवावी. २४ ते ४८ तासांनंतर मधपेटीचे गेट ओपन करावे. वसाहत शांत झाल्यावर राणी चेक करावी. या वसाहतीत काही दिवस फीडिंग म्हणजेच कृत्रिम भोजन द्यावे. सातेरी माशीची स्वार्मिंग पकडल्यानंतर राणी मेट नसेल तर राणी गेट लावू नये.

**उपाय** : मधमाश्यांचे स्वार्मिंग रोखण्यासाठी, त्यांचे नैसर्गिक शत्रु-किडींपासून संरक्षण करण्यासाठी; तसेच मकरंद व पराग यांच्या अभावी होणारे स्थलांतरण टाळण्यासाठी योग्यवेळी विभाजन करणे आवश्यक आहे. यातून मधमाशी पालनातील आर्थिक ताळमेळ जुळवणे शक्य होईल.

मकरंद व पराग निसर्गात आपल्या वसाहती असलेल्या ठिकाणी भरपूर असेल त्यावेळी विभाजन करावे. मधमाशी पालन साधारणपणे ऑगस्ट ते ऑक्टोबर आणि फेब्रुवारी- मार्चमध्ये करतात. काही मुद्दे खालीलप्रमाणे सांगता येतील.



१. मधुबनातून चांगल्या सशक्त वसाहती निवडणे.

२. रिकाम्या मधपेटीत व्यवस्थित साफसफाई करुन स्टॅन्डमध्ये पेटी तसेच दोरी, धूरयंत्र रिकाम्या चौकटी हे साहित्य तयार ठेवावे.

३. वसाहतीचे व्यवस्थित निरीक्षण करावे.

४. एक मीटर अंतरावर रिकामी मधपेटी ठेवावी. रिकाम्या मधपेटीचा दरवाजा बंद ठेवावा.

५. वसाहतीतून आपल्याला चार चौकटी करावयाच्या आहेत. यामध्ये तीन दिवसांच्या आतील राणीच्या अंड्यांची एक चौकट घ्यावी. त्यानंतर अनुक्रमे मकरंद, पराग, ब्रूड, लार्व्हा यांच्या फ्रेम द्याव्यात. पहिल्यांदा पराग, त्यानंतर अंडा, लार्व्हा ब्रूड, मकरंद अशा फ्रेम लावाव्यात. त्यानंतर वसाहतीला वरून झाकण लावून वसाहत मधुबनापासून तीन कि.मी. पेक्षा जास्त लांब घेऊन जावी.

६. वसाहत दुसऱ्या ठिकाणी ठेवल्यानंतर ज्या चौकटीवर अंडे असते, त्या ठिकाणी वसाहतीत राणीची अनुपस्थिती बधून मधमाश्या राणी घरे बांधतात.

७. साधारणपणे चार ते पाच दिवसानंतर निरीक्षण केल्यानंतर आपल्या लक्षात येईल की वसाहतीने राणी घरे बांधलेली आहेत. राणी घरे असलेली चौकट व्यवस्थित हाताळावी. राणी घरातून पाणी बाहेर येण्यासाठी पंधरा- सोळा दिवस लागतात.

९. राणी बाहेर आल्यानंतर दोन-तीन दिवसांत मधपेटीतून बाहेर पडून नरांशी संयोग करते व परत येते.

१०. बऱ्याचदा मधपेटीतून एकापेक्षा जास्त राण्या

बाहेर येतात त्यावेळी त्यातील फक्त सशक्त राणी ठेवून, दुसऱ्या राणीला मधमाश्या मारून टाकतात.

११. नरांशी संयोग करुन आल्यानंतर राणी कोष्टकात अंडे देणे चालू करते व आपली नवीन वसाहत मार्गी लावते. राणी माशी ही लैंगिकदृष्ट्या पूर्ण वाढ झालेली मादी असते. ती तिच्या आयुष्यात केवळ एकदाच नरांसोबत हवेत उडताना मिलन करते. एक फलित झालेली राणीमाशी तिच्या जीवनकाळात हजारो अंडी देते. एक सुदृढ राणीमाशी दिवसाकाठी दोन हजार अंडी देऊ शकते. राणीमाशीला वसाहतीत सर्वात जास्त आयुष्यमान असते. ती जवळपास पाच वर्षे जगते. तिचे पंख तिच्या शरीरापेक्षा जास्त लहान असतात. तिच्या भोवती असलेल्या कामकरी माश्यांमुळे मध्यभागी असलेली राणी स्पष्टपणे ओळखून येते. तिला डंख असतो पण ती त्याचा वापर फक्त इतर प्राण्यांना मारण्यासाठीच करते. राणी माशी अन्न म्हणून कधीही मध ग्रहण करत नाही.



राणी ज्यावेळेस मेटिंगसाठी बाहेर पडते त्यावेळेस ती हवेत ३० ते ४० फूट वरती चार ते आठ नरांशी सहयोग करते. त्यानंतर ती वसाहतीत परतते. त्यामध्ये राणीचा गोंधळ होण्याची शक्यता असते. म्हणून आपण वसाहतीच्या उजव्या किंवा डाव्या कोपऱ्यावर रंगीबेरंगी पोस्टर्स अथवा चित्रे लावली पाहिजेत. कारण राणी आयुष्यात एकदाच वसाहतीच्या बाहेर जाते. (त्यानंतर आपल्या निष्काळजीपणामुळे वा काही नैसर्गिक कारणांमुळे देखील ती वसाहत सोडून जाऊ शकते. अन्यथा राणी वसाहत सोडून जात नाही.) आपण विभाजन करताना वसाहतींमध्ये योग्य ते अंतर म्हणजे तीन मीटरपेक्षा जास्त अंतर ठेवले पाहिजे; म्हणजे राणी जेव्हा नरांशी सहयोग करून त्यानंतर परत येईल, तेव्हा आपली वसाहत तिला सापडली पाहिजे. सातेरी माशीमध्ये मधमाशी वसाहत सोडून जाण्याचे, उठावाचे प्रमाण जास्त असते. त्याचे नियोजन करण्यासाठीच सातेरी वसाहतीच्या प्रवेशद्वाराला आणि प्रतिबंधित द्वार बसवले जाते, जेणेकरून मधमाश्या बाहेर ये-जा करु शकतात. परंतु राणी बाहेर जाऊ शकत नाही. काही मधपाळ या कारणास्तव राणी माशीचे पंखही कापतात, जेणेकरून राणीला उडता येत नाही.

वसाहतीमध्ये आपण जेव्हा राणी चेक करतो त्यावेळेस आपल्याला जर राणी त्यांच्यात आढळली नाही, तर आपल्याला त्या वसाहतीत नवीन राणी तयार करावी लागते. स्थलांतरामध्ये मध काढल्यानंतर काही प्रमाणात आपल्या वसाहतीमध्ये राणीचे नुकसान होण्याची म्हणजे राणी मरण्याची शक्यता असते. जर वसाहतीत लवकर राणी तयार झाली नाही तर ही वसाहत संपण्याची शक्यता असते. वसाहतीचे मधमाश्यांचे विशिष्ट जीवनचक्र आहे. ते खंडित झाल्यास वसाहत अशक्त बनते आणि म्हणूनच आपण आपल्या नोंदवहीत नियमित वसाहत चेक करून राणी वसाहतीत कधी आली, कधी तयार झाली, याची नोंद ठेवली पाहिजे. आपल्या वसाहतीत राणी नसेल; आणि आपल्याकडे आपण तयार केलेल्या विभाजनामध्ये एकापेक्षा जास्त राण्या असतील, तर त्या राण्यांची मारामारी होऊन त्यातील एक राणी संपण्याची शक्यता असते. हे घडण्याच्या आत, त्यातून जर एक राणी पकडली आणि ती ज्या वसाहतीमध्ये राणी मिसिंग आहे त्या वसाहतीत ठेवली तर ते योग्य ठरते. हे करताना ती राणी राणीपिंजऱ्याच्या साह्याने २४ ते ४८ तास ठेवून नंतर ती त्या वसाहतीत मोकळी सोडली पाहिजे, जेणेकरून ती त्या वसाहतीमध्ये सेट होऊन जाते. ■